"नाटककार सतीश आळेकर' रसिकांच्या भेटीला

पुणे, ता. २३ - ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर यांच्यावरील "नाटककार सतीश आळेकर' हा माहितीपट अतुल पेठे यांनी तयार केला असून, या माहितीपटाचा पहिला खेळ दोन ऑक्टोबरला सकाळी साडेदहा वाजता सुदर्शन रंगमंच, शनिवार पेठ येथे होणार आहे.
माहितीपटाची संकल्पना, संहिता, छायाचित्रण आणि दिग्दर्शन अतुल पेठे यांचे आहे.

या दीड तासाच्या माहितीपटामध्ये सतीश आळेकरांचा नाट्यप्रवास जसा उलगडत जातो, तसाच स्वातंत्र्योत्तर भारताचा, पुण्याचा, मराठी रंगभूमीचा पटही समोर येतो. आळेकर यांच्या नाटकांचे योगदान आणि अर्थ सांगताना त्यातील विविध पदर उलगडण्याचा प्रयत्न यातून केला आहे. आळेकरांच्या नाटकांतील भवतालाचा, भाषेचा आणि प्रयोगाचा शोध घेताना कुठल्या परंपरांशी या नाटकांची नाळ जोडली गेली आहे, याचा मागोवा, तसेच १९४७ ते २००८ या कालखंडातील बदलती परिस्थिती आणि त्या परिस्थितीचे आळेकरांच्या नाटकांवर झालेले परिणाम तपासण्याचाही प्रयत्न इथे केला आहे, असे अतुल पेठे म्हणाले.

""आळेकरांच्या निमित्ताने सर्जनशील कलावंत आणि भवतालाचे नाते तपासण्याचाही प्रयत्न केला आहे. नाटकासारख्या जिवंत माध्यमाबाबत अनेकदा दस्तऐवजीकरण नसल्याने नाटक हा माध्यम प्रकार समजून घेणे कठीण होते. इथे ती उणीव दूर होऊन आळेकरांच्या नाटकांचे दर्शन घडू शकेल. "अतुल पेठे प्रॉडक्शन्स'ची ही निर्मिती असून, सहसंहितालेखन राहुल पुंगलिया यांनी केले आहे. डॉ. रेखा इनामदार साने या माहितीपटाच्या विषयतज्ज्ञ आहेत. संगीत नरेंद्र भिडे यांचे, तर संकलन समीर शिपूरकर यांचे आहे. हेमंत जोशी आणि कॅलिफोर्निया आर्टस असोसिएशन यांनी आर्थिक साह्य केले आहे, असेही पेठे यांनी सांगितले. दोन ऑक्टोबरचा सकाळचा खेळ निमंत्रितांसाठी असला तरी त्याच दिवशी दुपारी ४ आणि सायंकाळी सहा, असे खेळ "महाराष्ट्र कल्चरल सेंटर'ने आयोजित केले आहेत. या वेळी प्रा. समर नखाते यांच्या हस्ते डीव्हीडीचे प्रकाशनही होणार आहे. हे खेळ सर्वांसाठी असून, प्रवेशिका सुदर्शन रंगमंच येथे सायंकाळी सहा ते आठ या वेळात मिळतील.